**नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.**

दिनांक 22/04/2020 (बुधवार)
(सकाळ)

## पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे जुगार अडयावर धाड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणची कारवाई

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलिस निरिक्षक श्री. अनिल जिट्टावार यांना दिनांक 21/04/2020 रोजी खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, लॉकडाउन सुरु असतांना देखील शासनाने आदेशीत केलेल्या संचारबंदीचे उल्लंघन करुन काही इसम हे ब्राम्हणी गावातील एका दर्ग्याजवळ पोलिस ठाणे कळमेश्वर हद्दीत जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक 21/04/2020 रोजी चे दुपारी 03.00 वा. सुमारास स्थानिक गुन्हे शाखाचे पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता काही इसम 52 ताशपत्यावर पैशाची बाजी लाऊन हारजीतचा खेळ खेळतांना दिसून आले. पोलिसांना पाहून ते पळू लागताच, पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी 1) जावेद ईसाल पठाण, रा. ब्राम्हणी, 2) मोहमद ईशरद शेख, रा. इंदिरा नगर, 3) शाकिर बलदार खान, रा. वार्ड क्र 1 ब्रम्हणी, 4) राहुल बबनराव सिगणापुरे, रा. वार्ड 1 ब्राम्हणी, 5) कोमल शिवाजी तिखे रा. बस स्टोप कळमेश्वर, 6) निलेश मारोतराव धुवे, रा. बस स्टोप कळमेश्वर, 7) गिरीश श्रावण भिमटे, रा. वार्ड क्र 1 ब्राम्हणी 8) चंद्रशेखर रामभाउ वाकडे, रा. ब्राम्हणी, 9) प्रतीक हरेन्द्र जाधव व 10) आमीद ईरशाद पठाण, रा. ब्राम्हणी यांचे कडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

1) 16,000/– रुपये रोख रक्कम, 2) 8 मोबाइल संच किमती 83,000/– रुपये. 3) 52 ताशपत्ते व इतर साहित्य असा एकुण 99,000/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे.कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 12(अ) मुंबई जुगार कायदा सहकलम 188 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे आदेशाने पोउपनि सचिन मत्ते, सफौ जयप्रकाश शर्मा, लक्ष्मिप्रसाद दुबे, नापोशि सत्यशील कोठारे, पोशि प्रणय बनाफर, महेश बिसने व चासफौ साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




## सावनेर परिसरात अवैध मोहाफुल गावठी दारू वाहतुक करणाऱ्याविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही 02 आरोपींसह एकुण 70,000/— रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 22/04/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोस्टे सावनेर अंतर्गत कोवीड 19 संबंधाने पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर माहिती मिळाली की, पोस्टे सावनेर अंतर्गत एक मोटर सायकल वर 02 इसम अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू घेवुन येत असल्याचे माहितीवरून मौजा हेटी बायपास रोडवर नाकांबदी करून आरोपी 1) नरेंद्र हुकूमचंद जामदार वय 36 वर्षे रा. पहलेपार सावनेर याचे ताब्यातुन 100 लिटर मोहाफुल दारू व मोटर सायकल असा एकुण 70,000/— रू चा माल जप्त करण्यात आला. तसेच आरोपी नामे 2) वसंता कोल्हेकर हा मोटर सायकल वरून उडी घेवुन पडुन गेला. दोन्ही आरोपीविरूध्द पोस्टे सावनेर येथे अप. क्र. 239/20 कलम 65 (अ) (इ) महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे सावनेर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर गडेकर, पोलीस शिपाई रोहण डाखोरे, महिला पोलीस शिपाई नम्रता बघेल यांनी पार पाडली.



# देशी दारूची दुकान फोडणाऱ्या आरोपीतांना अटक
# स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक 20/04/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पथकाला खात्रीशिर गोपनिय बातमिदारामार्फत माहिती मिळाली की, पोलिस ठाणे खापरखेडा हददीत पोटा येथील लोकप्रीय देशी दारूचे दुकान फोडून त्या मधील देशी दारू दिनांक 20/04/2020 रोजी चोरीस गेली आहे. त्या संबंधाने पोलिस ठाणे खापरखेडा येथे फिर्यादी नामे– अवदेश गुप्तेशवर शर्मा, वय 35 वर्ष, रा. दहेगाव रंगारी याने दिनांक 21/04/2020 चे 22.44 वा. रिपोर्ट दिली की, अज्ञात आरोपीने दि 17/04/2020 ते 21/04/2020 रोजी रात्री दारम्यान बंद देशी दारू चे दुकानातुन छतावरील टिनामधुन आत प्रवेश करून 04 पेटी देशी दारू चे 59 बंपर प्रत्येकी 750 एम.एल चे एकुण 44,250 एम.एल किंमती 12,744/– रु. चा मुद्देमाल चोरून नेले. सदर गुन्हयात पो. स्टे. खापरखेडा येथे कलम 457, 380 भा.द.वी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अश्या मिळालेल्या माहितीच्या अनुषंघाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरील गुन्हयातील आरोपी नामे– 1) संतोष फुलचंद वर्मा, वय 37 वर्ष, 2) गोकुळ रामनरेश सहानी, वय 22 वर्ष व 3) सर्फराज अस्लम अन्सारी, वय 32 वर्ष, सर्व रा. सिल्लेवाडा कॉलनी, खापरखेडा, जि. नागपूर यांना अटक केले. आरोपीतांच्या ताब्यातुन 1) 750 एमएल चे 27 देशी दारूचे बंपर कि. 5886/–रू. व 2) दुचाकी मोटरसायकल कि. 25,000/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपीतांना पुढिल कार्यवाहीसाठी पोलिस ठाणे खापरखेडा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात पोउपनि श्री. सचिन मत्ते, सफौ श्री. लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा सुरज परमार, निलेश बर्वे, नापोशि सत्यशिल कोठारे, शैलेश यादव, पोशि प्रणय बनाफर, विरेन्द्र नरड व चालक सफौ साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर